जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2020
Times of India

# All activities, including lectures, at SUK suspended till March 31

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) administration has appealed to the students to vacate hostels and go home till March 31.

"Colleges have already been asked to shut their activities. Precautions have been taken to keep a check on the spread of coronavirus," an official from SUK said.

The administrative official of the university has announced that all activities, including lectures, at the SUK will be closed from March 16 to March 31.

SUK registrar Vilas Nandavadekar has appealed to the students, residing in the hostels, to leave the premises and go home as a precautionary measure to keep a check on the spread of coronavirus. He also appealed the students to return to the hostels in April as per the schedule of their annual examinations.

**The University Grants Commission (UGC) has already asked the universities and colleges to avoid large gatherings on campuses in the wake of coronavirus (Covid-19)**

"All education-related activities in the SUK have been stopped as per government order. However, the administrative work of the university will continue in the respective departments. Citizens and students are advised to not enter the university premises for morning or evening walks," he said.

Students also prefer to go home instead of staying in hostels. "We are leaving for home as we have no alternative. The study rooms have been shut and we cannot sit in hostel rooms and prepare for the examination. It's better to go home and study and return for the examination," a student, residing in the hostel, said.

The University Grants Commission (UGC) has already asked the universities and colleges to avoid large gatherings on campus in the wake of coronavirus (Covid-19).

## 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर निर्णय : एक एप्रिलपासून प्रारंभ होणार

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा लांबणीवर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राज्य शासन आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या आदेशानुसार, कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर दक्षता म्हणून शिवाजी विद्यापीठाने येत्या २७ मार्चपासून नियोजित केलेल्या परीक्षा लांबणीवर टाकण्याचा निर्णय घेतला आहे. १ एप्रिलपासून या परीक्षांचा प्रारंभ होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सोमवारी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांचा प्रारंभ २७ मार्चपासून होणार होता. त्यादृष्टीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाने नियोजन केले होते. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण विभागाने ३१ मार्चपर्यंतच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार विद्यापीठाने परीक्षा लांबणीवर टाकल्या. एक एप्रिलपासून परीक्षा आणि प्रात्यक्षिके पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होणार आहेत. त्याबाबतच्या सूचना कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठातील अधिविभागांना दिल्या आहेत, असे डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले.

दरम्यान, या सत्रामध्ये बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी. व्होक., बीसीए., बी.ए.बी.एड्., एम.एस्सी., एमसीए, एम.ए., डिप्लोमा, आदी अभ्यासक्रमांच्या एकूण ६८० परीक्षा होणार आहेत. २७ ते ३१ मार्च या कालावधीतील चार दिवसांच्या परीक्षांचा प्रश्न आहे. या काळातील बी.ए., बी.कॉम.च्या अभ्यासक्रमांचे पेपर हे संबंधित विषयांच्या परीक्षांच्या अखेरीस घेणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. एस. पळसे यांनी सांगितले.

### प्राध्यापकांसाठी 'वर्क फ्रॉम होम'

राज्य शासनाच्या आदेशानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय, अनुदानित, खासगी शैक्षणिक संस्था, महाविद्यालये तसेच विद्यापीठाच्या अधिविभागांमधील सर्व प्राध्यापकांनी २५ मार्चपर्यंत वर्क फ्रॉम होम (घरी राहून कामकाज)



### प्राचार्य, अधिष्ठातांची उपस्थिती आवश्यक

विद्यापीठातील कुलगुरु, प्र-कुलगुरु , कुलसचिव, उपकुलसचिव आणि महाविद्यालय, तंत्रनिकेतनचे प्राचार्य, संचालक, अधिष्ठाता आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नियमितरीत्या कार्यालयामध्ये उपस्थित राहणे

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलल्या

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** कोरोना विषाणूचा विद्यार्थ्यांना प्रादुर्भाव टाळण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठाच्या प्रात्यक्षिके व परीक्षा ३१ मार्चपर्यंत पुढे ढकलण्यात आले आहेत. अध्यापकांना २५ मार्चपर्यंत घरी राहून कामकाज करण्याची मुभा देण्यात आली आहे.

कोरोना विषाणूमुळे खबरदारीचा उपाय म्हणून शाळा, महाविद्यालये ३१ मार्चपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. २७ मार्चपासून शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्र परीक्षांना प्रारंभ होणार आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांतील २९३ महाविद्यालयांतून सुमारे २ लाख ५० हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

# शिवाजी विद्यापीठातील योगा वर्ग बंद

कोल्हापूर : सोमवारपासून कोरोना विषाणू संसर्गाचा धोका टाळण्यासाठी व संसर्ग पसरु नये याबाबत खबरदारीचा उपाय म्हणून शिवाजी विद्यापीठातील योगा वर्ग, खुली व्यायामशाळा, उपवने व उद्याने बंद राहणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली. विद्यापीठ परिसरात फिरावयास येणाऱ्या नागरिकांनी फिरावयास येणे टाळावे, असेही त्यांनी सांगितले.

# विद्यापीठात रंगला संगीत नाट्यमहोत्सव



कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत आणि नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संगीत नाट्य महोत्सवास शास्त्रीय गायन आणि नाट्यप्रयोगाची पर्वणी मिळाली. पहिल्या सत्रात संभाजी सावंत यांचे 'नाट्यकलेचे बदलते स्वरूप,' या विषयावर व्याख्यान झाले. त्यानंतर ज्ञानेश मुळे दिग्दर्शित 'तोच चंद्रमा नभात,' या एकांकिकेचे बहारदार सादरीकरण करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात गायक डॉ. शशांक मक्तेदार यांच्या शास्त्रीय गायनाने रसिकांना मुग्ध केले. आग्रा जयपूर या घराण्याचा अनोखा मिलाफ त्यांच्या सादरीकरणातून रसिकांनी अनुभवला. तबला साथ निखिल भगत तर हार्मोनियम अमित साळुंखे यांनी केली. महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ नाटककार संभाजी सावंत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. रणधीर शिंदे होते. स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. अंजली निगवेकर यांनी केले.

# अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत बदल आवश्यक

## डॉ. प्रतिभा पाटणकर; शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर टाइम्स टीम

'आजच्या तंत्रज्ञान युगातील बदलांनुसार शिक्षणक्षेत्रातील अध्ययन व अध्यापन प्रक्रियेमध्ये तंत्रज्ञानानुसार झालेले बदल आत्मसात करायला हवेत. यातून अध्ययन, अध्यापनाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी भावी शिक्षकांनी प्रयत्नशील रहावे' असे आवाहन शिक्षणशास्त्र विभगाच्या प्रमुख प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागामध्ये कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व शिक्षणशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने शैक्षणिक साधनांचे बदलते स्वरुप या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेचे उद्घाटन कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांचे हस्ते झाले. यावेळी डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले.

उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. गुरव म्हणाले, 'आज शिक्षण प्रक्रियेतील बदल लक्षात घेऊन अभ्यासक्रम तयार झाले आहेत पण याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. शिक्षकांनी सतत नव्या गोष्टींचा शोध घेतला पाहिजे व नवीन ज्ञान सातत्याने आत्मसात केले पाहिजे.'



कार्यशाळेमध्ये भोगावती महाविद्यालय कुरुकली येथील ग्रंथपाल पी. एस. कल्लोली यांनी कनेक्टिंग क्लासरुम या विषयावर मार्गदर्शन केले. व भैरवनाथ माध्यमिक हायस्कूल भुयेवाडी येथील शिक्षक एम. आर. पाटील यांनी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर मार्गदर्शन केले.

विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभाग, बी. जी. खराडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, ज्युनीयर कॉलेज ऑफ एज्युकेशन पेटाळा, वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय कळंबा, ताराराणी कॉलेज ऑफ एज्युकेशन कोल्हापूर येथील शिक्षक व विद्यार्थ्यांनी कृतीयुक्त सहभाग घेतला.